महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड
(नागपूर मेट्रो रेल प्रकल्प )

# आता नॅशनल कॅन्सर इन्स्टिटयूट ते खापरी मेट्रो स्टेशन फीडर बस सेवा उपलब्ध



नागपूर : महा-मेट्रो आणि नागपूर महानगरपालिका (NMC) यांच्या संयुक्त विद्यमाने आज नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्यूट, जामठा येथून खापरी मेट्रो स्टेशनपर्यंत धावणार्यी फीडर बस सेवा सुरुवात करण्यात आली. या नव्या सेवेचा मोठा लाभ रुग्ण, त्यांचे नातेवाईक तसेच नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्यूटमधील डॉक्टर, परिचारिका, कर्मचारी आणि स्टाफ यांना होणार आहे.

महा-मेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्री. श्रावण हर्डीकर, मनपा अतिरिक्त आयुक्त सौ. वासुमना पंत, नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्यूटचे सरचिटणीस आणि मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. शैलेश जोगळेकर तसेच महा-मेट्रोचे संचालक (स्ट्रॅटेजिक प्लॅनिंग) श्री. अनिल कोकाटे यांच्या हस्ते हिरवी झेंण्डा दाखवत आज पासून फिडर बस सेवा सुरु करण्यात आली.

उल्लेखनीय आहे कि,यापूर्वी नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्यूटच्या वतीने त्यांच्या कर्मचाऱ्याकरता शहरातून बस सेवाचा वापर करण्यात यायचा तो आता बंद होणार असून आता खऱ्या अर्थाने मेट्रो ते डेस्टिनेशन अश्या लास्ट माईल कनेक्टिव्हीटी प्रदान करण्यात आली आहे.

खापरी मेट्रो स्टेशनच्या आसपास आयटी पार्क, मिहान,एम्स,आयआयएम यांसारख्या अनेक महत्त्वपूर्ण संस्था व कार्यालये कार्यरत आहेत. या पार्श्वभूमीवर नव्याने सुरू झालेली फीडर बस सेवा खापरी स्टेशन ते नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्यूट यांदरम्यानची कनेक्टिव्हिटी अधिक सुलभ, सुरक्षित आणि द्रुतगती बनवत आहे. फर्स्ट आणि लास्ट माईल कनेक्टिव्हिटीमधील अडचणी दूर करून प्रवासी संख्या वाढवणे, शहरातील वाहतूक कोंडी कमी करणे आणि नागपुरातील सार्वजनिक वाहतूक मजबूत करणे हा महा-मेट्रोचा उद्देश असल्याचे या वेळी स्पष्ट करण्यात आले.

या सेवेच्या शुभारंभानंतर बोलताना श्री. हर्डीकर म्हणाले की, "फीडर बस सेवा सुरू झाल्यामुळे रुग्णसेवा, कर्मचारी प्रवास तसेच सर्वसामान्य नागरिकांसाठी प्रवास अधिक सोयीस्कर, वेगवान आणि सुरक्षित होणार आहे."

श्री. हर्डीकर यांनी यावेळी नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्यूटची सविस्तर पाहणीही केली. या वेळी श्री. जोगळेकर यांनी हॉस्पिटलमध्ये उपलब्ध असलेल्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सेवा, उपचार व्यवस्था आणि विविध रुग्ण–सुविधांची माहिती दिली.

पाहणीदरम्यान आपल्या भावना व्यक्त करताना श्री. हर्डीकर म्हणाले, "अनेक दिवसांपासूनची इच्छा अखेर आज पूर्ण झाली. एनसीआयची वास्तू, संस्था आणि रुग्णालयाचा व्यावसायिक दर्जा हा अपेक्षेपेक्षा अनेक पट अधिक उत्कृष्ट असून त्याचबरोबर सेवाभाव आणि संवेदनशीलता प्रत्येक ठिकाणी जाणवली. एनसीआयची संपूर्ण टीम समर्पणभावनेने रुग्णसेवा करत आहे. या प्रयत्नांतून उभी राहिलेली ही संस्था खरोखरच आदर्श आहे. संपूर्ण टीमला माझा सलाम आणि भविष्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा.